International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# पर्यावरणीय जाणिवेचा कृतिशील आविष्कार: कथा सागरेश्वर अभयारण्याची

**डॉ. रचना माने**
*[1] मराठी विभाग, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर*
*Corresponding Author –* **डॉ. रचना माने**
**DOI - 10.5281/zenodo.18491276**

पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करायला पाहिजे, हे सगळ्या जणांना माहितीअसते; पटतही असते. मात्र, त्यासाठी व्यक्तिगत पातळीवर काय करायचे याची कुठेही स्पष्टता असत नाही. एक माणूस करूनकरून काय करणार आणि आभाळ फाटलेल्या पर्यावरणाच्या वस्त्राला संरक्षणाची ठिगळे तरी किती लावणार, असाच सूर नेहमी उमटताना दिसतो. मात्र, निसर्ग मित्र धों.म.मोहिते या एका माणसाने एकट्याच्या बळावर एका अभयारण्याची निर्मिती करून उजाड आणि दुष्काळी भागाचे नंदनवनात रूपांतर कसे केले, त्याची प्रेरणादायी कहाणी म्हणजे कथासागरेश्वर अभयारण्याची हे अनुभवकथन होय... तत्पूर्वी मोहिते यांच्या विषयी थोडेसे... क्रान्तिसिंह नाना पाटलांचे 'तुफानसेने' त कॅप्टन असणाऱ्या मोहिते यांचे मूळ गाव वडगाव, जिल्हा सांगली. गावचे सरपंच असणारे मोहिते सामाजिक कार्यकर्ते, मुक्तपत्रकार, लेखक आणि साहित्यिक देखीलहोते.

**आशयसूत्र:**

कथा सागरेश्वर अभयारण्याची' हे अनुभवकथन सागरेश्वर वन्यजीव अभयारण्याच्या निर्मितीमागील संघर्ष आणि धों. म.मोहितेयांच्या अथक प्रयत्नांची कथा सांगते. या पुस्तकात त्यांनी डोंगराशी झुंज देऊन, वृक्षारोपण करून या मानवनिर्मित जंगलात हरणांसारख्या वन्यजीवांचा परिचय करून देण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. एका कर्मयोग्याचीइ च्छाशक्ती आणि त्याच्या सातत्याने पाठपुराव्याला आलेले यश म्हणजे सांगली जिल्ह्यातील सागरेश्वर काळवीट अभयारण्य होय. तत्कालिन दक्षिण सातारा जिल्ह्याचा पूर्वभाग म्हणजे दुष्काळाच्या झळा वर्षानुवर्षे सोसणारा भाग. वास्तविक महाराष्ट्राची वरदायिनी असलेल्या कृष्णा नदीच्याखोऱ्याचा हा परिसर. मात्र, सिंचनाच्या नियोजनाच्या अभावाने सातत्याने अवर्षणग्रस्त भाग. केवळ पशुधनावर गुजराण करणारे नागरिक. अशातच आताच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा, कडेगाव आणि पलुस या तालुक्यांच्या सीमेवर एका खेड्यात जन्मलेल्या धोंडिबा मोहिते या युवकाला दुष्काळाच्या झळा सोसवेनात आणि त्यापायी होणारे गावकऱ्यांचे हाल ही पहावेनात. माणदेशातून येणारे धनगरांचे तांडे आणि सोबत शेळ्या-मेंढ्यांचे कळपपाहून, आपण याभागात पाण्याची चांगली सोय केली पाहिजे असे मोहितेयांच्या मनाने घेतले. पाणी मुबलक हवे असेल, तर झाडांची संख्या वाढली पाहिजे असे गावातीलच एका बुजुर्गाने मोहितेयांना सांगितले. त्यामुळे आपण या वैराणमाळरानावर जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत, असे मोहिते यांनीठरवले. ज्या वेळी गावच्या चावडीवर त्यांनी हा विषय बोलून दाखवला, त्यावेळी सगळ्यांनी, "अरे झाडे जगवायला तरी पाणी कुठून आणशील?" असे म्हणत मोहितेंना वेड्यात काढले. मात्र मोहिते निराश झाले नाहीत. त्यांनी यासाठी सरकार दरबारी

पाठपुरावा करायचा ठरवले. मोहिते त्यावेळी शेतकरी कामगारपक्षा चे काम करत. शेतकरी बांधवांच्या हितासाठी काय करता येऊ शकेल, असा विचार ते सातत्याने करत. त्यामुळे परिसरातील शेतीला पाणी द्यायचे असेल, तर जलसंधारण केले पाहिजे; भूजल पातळी वाढवायची असेल तर वृक्षारोपण केले पाहिजे याची त्यांना खात्री पटली.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे जन्म गाव देवराष्ट्रे हे सागरेश्वराच्या डोंगराच्या कुशीतले च एक गाव. त्यावेळी सागरेश्वराचा सगळा डोंगर उघडा-बोडकाअसाच होता. अशातच मोहित्यांचे वडगाव हे गाव. मोहितेंनी राज्याच्या वन खात्याला पत्र लिहून वृक्षारोपणासाठी सहकार्य करण्याची विनंती केली. गावकऱ्यांची बैठक घेतली आणि त्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून सांगायला सुरुवात केली, त्यासाठी मोहिते शेतकऱ्याला त्याच्या शेतात जाऊन भेटू लागले. बांधावर बसून फडक्यात गुंडाळून आणलेली मीठ-भाकर खाता खाता मोहितें चे समाजप्रबोधना चे काम सुरू झाले. मात्र, कोणत्याही नव्या संकल्पने ची ज्याप्रमाणे सुरुवातीला थट्टा होते, तसाच अनुभव मोहितेंना येत गेला. एखादा अशी थट्टा-मस्करी पाहून निराश झाला असता आणि त्याने असा जगावेगळा नाद सोडून दिला असता. मात्र, जितकी थट्टा जास्त होत गेली, तितका मोहितेंचा निर्धार अधिक कडवा होत गेला.तत्कालीन केंद्रीय संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांना मोहितेंनी पत्र लिहिले. यशवंतरावांनी मोहितेंना दिल्लीला बोलावले. मोहितेंनी आपली अभयारण्याची संकल्पना समजावून सांगितली. आपल्या भागातला एक सद्गृहस्थ पंचक्रोशीच्या भल्यासाठी काही करतो आहे, हे समजून यशवंतरावांनी ही पक्षीय भेद दूर सारत, त्यांना मदत करण्याचे ठरवले. यशवंतरावांच्या आदेशामुळे शासकीय यंत्रणेची चाके भराभरा फिरू लागली. अखेर २१ ऑगस्ट १९७१ रोजी धोंडीबा मोहितेयांच्या हस्ते पहिल्या झाडाचे वृक्षरोपण करुन सागरेश्वर अभयारण्याची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. आज देशातील एकमेव मानवनिर्मित अभयारण्य अशी या अभयारण्याची ओळख आहे, हे विशेष.

कऱ्हाड-सांगली रस्त्यावर सांगलीपासून ३०कि. मी. अंतरावर असणारे हे सागरेश्वर काळविट अभयारण्य १०चौ. कि. मी. क्षेत्रात पसरले आहे. येथेसागरेश्वराचे देवालयअसून, सागरेश्वराच्या नावानेच तिथे देवराई आहे. या अभयारण्यात विविध वृक्ष, प्राणी, पक्षी, अजगरासह विविध सर्पही आढळतात. हे पुस्तकसागरेश्वर वन्यजीवअभयारण्याच्या निर्मितीचा इतिहास आणि त्या मागील श्री. धों. म. मोहिते यांचे योगदान यावर आधारित आहे. एका निर्जन डोंगरावर वृक्षारोपण करून मानवनिर्मित जंगल तयारकरण्यात आले. या जंगलात चितळ आणि सांबर हरणांचा परिचय करण्यात आला. १०/१०/१९८५ मध्ये हा परिसर वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित झाला. १९मार्च१९७०यादिवशी ताडोबा अभयारण्याच्या त्यांना गेटमनने परवानगीशिवाय प्रवेश नाकारल्यामुळे आवो जावो घर तुम्हारा या वृत्तीमुळे जंगलसंपत्तीची अपरिमित लूट झाल्यामुळे उघड्याबोडक्या पडलेल्या आपल्या सागरेश्वर डोंगरावर अभयारण्य करायचेच हा वळवळलेला किडा इथून ते १०/१०/१९८५ मध्ये या परिसराला सागरेश्वर अभयारण्य म्हणून सरकार दरबारी मिळालेली मान्यता या प्रवासात लेखकाला अनेक बरेवाईट अनुभव आले, विविध वृत्ती प्रवृत्तींची अनेक माणसे भेटली, कुणी धों. म. मोहित्यांची भूमिका व तळमळ बघून त्यांच्या कार्यास सहकार्य केले तर कुणी खोडा घालण्याचा प्रयत्न केला. पण या सगळ्या गोष्टींवर मात करत यशवंतराव चव्हाण यांच्या भरभक्कम पाठिंबाच्या सहाय्याने व शासकीय यंत्रणेच्या मदती ने धों. म. मोहितेंनी मानवनिर्मित अभयारण्य उभारण्याची अशक्यप्राय वाटणारी कल्पना सत्यात उतरवून दाखवली. कोणत्याही गोष्टी मुळे निराश न होता, खचून न जाता

त्यांच्या सातत्यपूर्ण चिकाटी च्या प्रयत्नांचे व कष्टाचे हे यश म्हणावे लागेल. हे सगळं करत असताना सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीसाठी आलेल्या फंडातील एका आई-वडिलांचे व त्यांच्या आयुष्यात आलेल्या मान्यवरांचे संस्कार व त्यांची स्वतःची सार्वजनिक कामाची नशा असल्याचे दिसून येते. समाजाप्रतिच्या त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत ६ऑगस्ट १९९४ रोजी राजधानी दिल्लीतील राष्ट्रपती भवनांमध्ये त्यांना इंदिरा प्रियदर्शनी वृक्ष मित्र पुरस्कार देऊ

गौरवण्यात आले. पुस्तकात या सर्व प्रक्रियेतील धों.म. मोहिते यांचा संघर्ष आणि जिद्द यांचे चित्रण आहे. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभव कथनाचा जेव्हा आपण अभ्यास करतो तेव्हा पुढील वांग्मयीन विशेष दिसून येतात.पर्यावरणीय जाणिवा हे अनुभव कथनाच पहिलं आणि अत्यंत महत्त्वाचं वांग्मयीन वैशिष्ट्य. लहानपणी अनुभवलेल्या हिरव्यागार परिसराचे रूपांतर आज उजाड, उघड्या-बोडक्या माळात झाल्याने मनाने खिन्न झालेल्या पण त्याच वेळेला तिथे नव्याने तीच हिरवीगार समृद्धी अभयारण्याच्या माध्यमातून निर्माण करण्याच्या निश्चयाने प्रेरित झालेल्या व त्यानुसार असंख्य अडचणींवर मात करून शासनाच्या मदतीने प्रत्यक्ष ते अभयारण्य आकारास आणलेल्या एका ध्येयवेड्या व्यक्तीची कथा म्हणजे एक कथा सागरीश्वर अभयारण्याची हे पुस्तक होय. या सर्व प्रवासात पर्यावरणाचा होणारा ऱ्हास भरून काढण्यासाठी आपल्या परीने धडपडणाऱ्या व आशियाखंडातील पहिले मानव निर्मित अभयारण्य निर्माण करणाऱ्या अवलियाची ही कथा. लहानपणी लेखकाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये पेरलेल्या व त्याच्या मनामध्ये चांगली चरुसलेल्या पर्यावरणीय जाणिवेची फलश्रुती म्हणूनच हे अभयारण्य आकारास आले.

सामाजिक बांधिलकी चा प्रत्यय हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य. प्रचंड मोठ्या प्रमाणाव होत असणारा पर्यावरणाचा ऱ्हास समाजाला नेहमीच घात कठरताना अनुभवावया येतो. लेखकानेअभयारण्य निर्मितीचा घेतलेला ध्यास, त्यातून प्रचंड चिकाटीने व जिद्दीने केलेली अभयारण्याची निर्मिती, प्रशासकीय पातळीवर व लोकांच्या मनामध्ये अभयारण्याविषयी निर्माण केलेली व रुजलेली आपुलकीची भावना या सगळ्यातून लेखकाच्या सामाजिक बांधिलकी चाप्रत्यय येतो.

प्रभावी व्यक्ति चित्रण हे या अनुभवकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य. या अनुभव कथनात खूप साऱ्या व्यक्तिरेखा भेटतात. अनुभव कथनातील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून एक अनोखा, अविश्वसनीय असा जिद्दी लढा वाचकांच्या समोर उभा राहतो. कथानकाची गरज म्हणून आलेल्या ह्या व्यक्तींचे लेखकाने मोजक्या पण अतिशय प्रभावी शब्दांमध्ये चित्रण केले आहे.स्वतःच्या वेगळ्या वैशिष्ट्या निशी आलेली प्रत्येक व्यक्ती वचकाच्या मनावर आपली वेगळी छाप ठेवून जाते. अनुभव कथनाला एक प्रकारची गती मानता प्राप्त करून देण्याचे काम या व्यक्तीरेखांच्या माध्यमातून होते. प्रामुख्याने स्वतः लेखक धों.म.मोहिते, भारताचे तत्कालीन गृहमंत्री यशवंतराव चव्हाण, मा. वसंतदादा पाटील, मा. शरद पवार, तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले, तत्कालीन मंत्री स. गो. बर्वे, वनाधिकारी मावीन कुर्वे, उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर यासारख्या एक ना अनेक

व्यक्तिरेखा अनुभव कथन वाचताना आपणाला भेटतात. अशाप्रकारे अनेक व्यक्ति चित्रणांच्या साहाय्याने अभयारण्य निर्मितीचा हा प्रवास पुढे सरकत जातो. अतिशय प्रभावी व आटोपशीर अशा या व्यक्ति चित्रणामुळे पुस्तक कुठेही रेंगाळत नाही. परिणामी अनुभव कथनाला एक प्रवाहीपणा व गती प्राप्त झाली आहे.

नाट्यमय घटना –प्रसंग हे या अनुभव कथनाचे आणखी एक वैशिष्ट्य. अभयारण्य उभारताना अनुभवास आलेल्या अनेक घटना – प्रसंगांची मांडणी लेखकाने अतिशय वस्तुनिष्ठ पद्धतीने व तितक्याच नाट्यमयरित्या केली आहे. मानव निर्मित अशा सागरेश्वर अभयारण्याच्या निर्मितीचा प्रवास काही सहज सोपा नव्हता. अभयारण्याची उभारणी करताना लेखकाला अनेक बऱ्या वाईट घटना प्रसंगांना सामोरे जावे लागले. अनेक प्रसंग लेखकाची जिद्द, चिकाटी पाहणारे होते. लेखकाच्या सहनशीलतेची परीक्षा घेणारे होते. पुस्तकाच्या सुरुवातीलाच ताडोबा अभयारण्यात प्रवेश करताना लेखकाला व त्याच्या मित्रांना अडवले जाण्याचा प्रसंग सागरेश्व रअभयारण्य निर्मितीसाठी कसा प्रेरक ठरला याचे वर्णन येते. विवेचनाच्या ओघात पुढे अनेक घटना प्रसंग आले आहे. अभयारण्य उभारताना अनुभवास आलेल्या अनेक घटना – प्रसंगांची मांडणी लेखकाने अतिशय वस्तुनिष्ठ पद्धतीने व तितक्याच नाट्यमयरित्या केली आहे. अभयारण्य निर्मितीचा हा सारा प्रवास या विविध घटना प्रसंगाच्या माध्यमातून पुढे पुढे सरकत जातो. एखाद्या चलतचित्रा प्रमाणे पटपट व सलग येणाऱ्या या प्रसंगांमुळे, त्यातील नाट्यमयतेमुळे ते प्रसंग वाचकाच्या नजरेसमोर आहे तसे उभे राहतात. त्याच बरोबर लेखक कोणत्याही एखाद्या प्रसंगामध्ये किंवा व्यक्ति चित्रणामध्ये फार काळ रेंगाळत राहत नसल्यामुळे तो प्रसंग, ते पात्र कंटाळवाणे देखील होत नाही.

कोणत्याही साहित्य प्रकाराचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा त्यामध्ये आशय जितका महत्त्वाचा असतो तितकीच अभिव्यक्ती ही महत्त्वाची असते. साहित्य कृती मध्ये ही अभिव्यक्ती भाषेच्या माध्यमातून होत असते. आशयाचा ठसा जसा वाचकाच्या मनावर उठतो तसा अभिव्यक्तीचा म्हणजे भाषेचा ठसा देखील वाचकाच्या मनावरती उमटतो. लेखकाच्या मनातील आशयाचे वाचकापर्यंत वहन करण्याचे साधन म्हणून साहित्य कृतीत भाषा येते. आशयानुरूप भाषेचा प्रभावीपणे केलेला वापर लेखकाचे विचार वाचकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवतो. म्हणूनच साहित्यामध्ये आशयाला जितके महत्त्वाचे स्थान आहे तितकेच महत्त्वाचे स्थान भाषा शैलीला सुद्धा आहे. भाषा शैली कोणत्याही पुस्तकाचा एक अविभाज्य भाग असते.कथा सागरेश्वर अभयारण्याची या अनुभव कथनात लेखक धों. म. मोहिते यांनी उपयोजितलेल्या भाषा शैलीचा जेव्हा आपण अभ्यास करतो तेव्हा लक्षात येते की त्यांनी निवेदनासाठी नागर भाषेचा म्हणजेच प्रमाण भाषेचा वापर केला आहे. लेखकाने संवादासाठी प्रादेशिक भाषेचा म्हणजेच बोली भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे भाषेला एक प्रकारचे सौंदर्य आणि जिव्हाळा प्राप्त झाला आहे. लेखक सांगली जवळील मोहित्यांचे वडगाव या गावचे. सहाजिकच तिथल्या प्रादेशिक बोलीचा वापर मोठ्या प्रमाणात झाला आहे. प्रादेशिक बोलीचा अविभाज्य भाग म्हणजे म्हणी. परिणामतः लेखकाच्या लेखनामध्येही अशा

म्हणी वेळोवेळी आल्या आहेत. अगदी कमी शब्दांमध्ये खूप सारा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य या म्हणींमध्ये असते. संवाद- निवेदनामध्ये अगदी सहजतेने आणि ओघाने आलेल्या या म्हणींमुळे भाषेला एक प्रकारचे सौंदर्य प्राप्त झाले आहे, जिवंतपणा आला आहे. उदा सारागाव मामाचा, एक नाही कामाचा... म्हणीं प्रमाणे बोली भाषेचा एक विभाज्य भाग म्हणजे वाक्प्रचार. म्हणींप्रमाणेच अगदी कमी शब्दांमध्ये खूप सारा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य या वाक्प्रचारांमध्ये असते. परिणामतः लेखकाच्या लेखनामध्ये असे वाक्यप्रचार वेळोवेळी आले आहेत. उदा. घुणा निघणे, गाडा अडणे, वाटाण्याच्या अक्षता मिळणे, तडीस नेणे, नकार घंटा, काखेत शिरणे, अक्कल हुशारी, राजी खुषी, बोलणे खुंटणे.... संवाद- निवेदनामध्ये अगदी सहजतेने आणि ओघाने आलेल्या या वाक्प्रचारांमुळे भाषेला एक प्रकारचे सौंदर्य प्राप्त झाले आहे, जिवंतपणा आला आहे. चित्रात्मक वर्णने हे लेखकाच्या भाषा शैली चे आणखी एक वैशिष्ट्य. घटना प्रसंग पात्रांच्या चित्रमय वर्णनामुळे ते घटना-प्रसंग, पात्र वाचकाच्या मन:चक्षुसमोर यथार्थपणे उभे राहते. व्यक्ती असो, घटना असो वा प्रसंग; तो अतिशय नाट्यात्मक पद्धतीने शब्दबद्ध करण्याचे सामर्थ्य लेखकाच्या लेखणीत आहे. अल्पाक्षर मणीयत्व अथवा आटोपशीर पणा हे लेखकाच्या लेखणीचे आणखी एक वैशिष्ट्य. संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक घटना प्रसंग, व्यक्ती येतात. पण त्या सर्वांचे आटोपशीर व अतिशय प्रभावी असे चित्रण लेखकाने केले आहे एखाद्या घटनेचे व व्यक्तीचे चित्रण करताना लेखक कुठेही रेंगाळताना दिसत नाही. परिणामी वाचनामध्ये प्रवाहीपणा येतो. कुठेही कंटाळवानेपणा जाणवत नाही. खुमासदार संवाद हे या आत्मकथनाचे आणखी एक वांग्मयीन वैशिष्ट्य. व्यक्ती व प्रसंग यांना साकारकरण्याचे, प्रकट करण्याचे सामर्थ्य संवादामध्ये असते. अनुभव कथनामध्ये आलेले संवाद साधेच पण खुमासदार आहेत. एखाद्या व्यक्तीचा साधेपणा-सरळपणा तर एखाद्याचा अडेलतट्टू पणा, एखाद्याचा काम चुकारपणा तर एखाद्याचा आडमुठे पणा, एखाद्या ची कामात खोडा घालण्याची वृत्ती तर एखाद्याची पाय ओढण्याची वृत्ती, एखाद्याची सहकार्याची भावना तर एखाद्याचे प्रेरणादायी प्रोत्साहन सारे काही संवादातून, विशिष्ट अशा घटना प्रसंगातून व्यक्त होते. त्या त्या पात्राचे स्वभाव विशेष उलगडून दाखवणारे हे संवाद अनुभव कथनाला एक गती प्राप्त करून देतात, तसेच लेखकाच्या मनातला आशय वाचकापर्यंत अलगद पोहोचवतात. लेखकाने भाषेचा वापर पात्र-प्रदेशांनुसार केला आहे. अभयारण्य निर्मितीच्या या प्रवासात लेखकाचा अनेक राजकीय व प्रशासकीय व्यक्तींशी सातत्याने संपर्क येतो. या पात्रांचे चित्रण करताना विशेषत: वेगवेगळ्या प्रदेशातून आलेल्या प्रशासकीय व्यक्तींचे चित्रण करत असताना ज्या प्रदेशातून त्या व्यक्ती आलेल्या आह तेथील प्रादेशिक भाषेचा त्यांच्या बोलण्यामध्ये जाणवणारा प्रभाव/ठसा लेखकाने त्यांच्या संवादाच्या माध्यमातून शब्दबद्ध केला आहे. वेगवेगळ्या प्रदेशातील पात्रांच्या बोलण्यामध्ये जाणवणारा प्रादेशिक भाषेचा हे ललेखकाने त्यांच्या संवादाच्या माध्यमातून अतिशय यथार्थपणे व प्रभावीपणे टिपला आहे. ओघवते पणा हे या आत्मकथनाचे आणखी एक वांगमयीन वैशिष्ट्य. या अनुभव कथनामध्ये मोहिते यांनी सर्वच घटना, प्रसंग, पात्रांचे चित्रण अतिशय ओघवत्या

शैलीमध्ये केले आहे. परिणामतः कथानकाला एक प्रवाहीपणा आला आहे. अशाप्रकारे कथा सागरेश्वर अभयारण्याची या अनुभव कथनामधील लेखकाच्या भाषा शैलीचे वेगवेगळे विशेष दिसून येतात.वरील वांग्मयीन विशेषांनी नटलेले ‘कथा सा गरेश्वर अभयारण्याची’ हे आत्मकथन वाचकाच्या मनाला भावते.

**समारोप:**

समाजासाठी, पर्यावरण रक्षणासाठी झपाटलेल्या ध्येय वेड्या अवलियाची कथा म्हणजेच ‘कथा सागरेश्वर अभयारण्याची’ हे पुस्तक होय. धों. म. मोहिते यांची ही जिद्द, हा संघर्ष; समाजासाठी, पर्यावरण रक्षणासाठी झपाटलेल्या ध्येय वेड्या अवलियाचीही कथा तुम्हा आम्हा सर्वांसाठी, पुढच्या कित्येक पिढ्यांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

**साधन सूची:**

1. मोहिते, धों. म., ‘कथा सागरेश्वर अभयारण्याची’, इंद्रायणी साहित्य, प्र. आ. १९९६